# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ.

३३ के. व्हि. उपकेंद्र, एन ४ सिडको, '' प्रकाश कुंज '' औरंगाबाद - ४३१००३ दुरध्वनि व फॅक्स क्रमांक (०२४०) २४७२३६३

**No,CGRF/AZ/AUR/U/59/2007/28/** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ( O & M )**
**M.S.E.D.C.L. O&M Urban Circle,**
**Aurangabad.**

**Sub: Forwarding of Grievance in resepect of Shri Laxmikaint Wamanrao Kulkarni Flat No.5, Suvarn Shilp,Devanagari , Aurangabad (Consumer No. 490012288587)**

**( Case No: CGRF/AZ/AUR/U/59/2007/28 )**

**Dear Sir**

**Please find enclosed herewith a copy of the Grievance received by the Forum from Shri Laxmikaint Wamanrao Kulkarni Flat No.5, Suvarn Shilp,Devanagari , Aurangabad (Con. No. 490012288587)**

**You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of this letter.**

**The hearing of the grievance is fixed on dated 16.10.2007 at 11.30 Hours .**

.

**Encl: As above**
**Copy to:**

Shri, **Laxmikaint W. Kulkarni**
**Flat No.5, Suvarn Shilp,Devanagari ,**
**Aurangabad**

**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/५९/२००७/२८**
**तक्रार दाखल दिनांक ;- २८/०९/२००७**
**निकाल दिनांक ;- २३/१०/२००७**

**श्री लक्ष्मीकांत वामनराव कुलकर्णी,**
५,सुवर्ण शिल्प, देवानगरी,
शहानुरमियाँ दर्गा, औरंगबाद. अर्जदार/ग्राहक

**विरुध्द**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
शहर मंडळ, औरंगाबाद.

विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६ च्या अंतर्गत गा-हाणे.

१) अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दिनांक २८/०९/२००७ रोजी दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २८/०९/२००७ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले.

अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १६/१०/२००७ रोजी ठेवण्यात आली.

२) ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.
अर्जदार याने देवानगरी येथे घरगुती वीज वापरासाठी नवीन वीज पुरवठा घेतला असून ते त्या जागेत दिनांक ४ नोव्हेंम्बर २००६ पासून राहात आहे. त्यांनी वीजेच्या वापराचे मासिक बिलाची अनेक वेळा मागणी केली पण महावितरण कंपनी तर्फे त्याना पहिले बिल मे २००७ मध्ये देण्यात आले. सदरील बिल जास्त रकमेचे असल्यामुळे त्यांनी महावितरणच्या स्थानिक कार्यालयाकडे दिनांक २५/०७/२००७ रोजी तक्रार केली.तेव्हा त्यांना देण्यात आलेले रुपये २३७०/- च्या बिला ऐवजी १५००/- रुपये भरण्याचे सांगण्यात आले जे त्यांनी भरले आहे. त्यानंतर त्यांना ऑगस्ट २००७ चे सरासरीवर आधारीत बिल देण्यात आले. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार महावितरण कंपनी तर्फे त्यांना देण्यात आलेली डिंसेम्बर २००६ ते एप्रिल २००७ या काळातील वीज बिले चुकीची असून सुधारीत बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

३) दिनांक १६/१०/२००७ रोजी मंचासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी नोडल अधिकारी श्री एस. जी. पवार तसेच श्री के. आर. येरमाळ, उप-कार्यकारी अभियंता गारखेडा, हे महावितरण कंपनी तर्फे उपस्थीत होते. ग्राहक प्रतिनिधी म्हणून श्री वामनराव कुलकर्णी हे उपस्थीत होते.सुनावणीच्यावेळी महावितरण कंपनी तर्फे नोडल अधिकारी श्री पवार यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जबाब मंचात दाखल केला. त्यांनी दाखल केलेल्या जबाबानुसार अर्जदारास नविन वीज पुवठा देण्यात आल्यानंतर योग्य वेळी मासीक वीज बिले देण्यात आली आहेत.जून २००७ मध्ये ग्राहकास देण्यात आलेल्या रुपये २३७०/- च्या बिलापोटी त्यांनी १५००/- रुपये भरले असल्याचे त्यांनी सांगितले. ग्राहकास देण्यात आलेली वीज बिले ही बरोबर असून ग्राहकाची तक्रार खारीज करण्याची विनती त्यानी मंचास केली आहे.

४) दोन्ही बाजूकडून मंचात दाखल करण्यात आलेल्या कागद पत्रावरुन व मंचासमोर झालेल्या सूनावणी वरुन असे आढळून येते की, महावितरण कंपनी तर्फे अर्जदारास नोव्हेम्बर २००६ मध्ये घरगूती वापरासाठी वीज पुरवठा देण्यात आला. त्याला देण्यात आलेला ग्राहक क्रमांक ४९००१२२८८५९७ असा असून मिटर चा क्रमांक ९००१०४९०२६ असा आहे. महावितरण कंपनी तर्फे दाखल करण्यात आलेले सी. पी. एल. चे अवलोकन केल्यानंतर असे आढळून येते कि, नोव्हेंम्बर २००६ ते एप्रिल २००७ या काळात सी. पी. एल. वर जरी वीज वापराच्या मीटर वरिल रिडिंगच्या नोंदी दिसत असल्यातरी या काळात त्याला बील न भरल्यामुळे कोणतेही व्याज व दंड आकारण्यात आलेले दिसत नाही. या वरुन अर्जदारास पहीले वीज वापराचे बिल मे २००७ मध्ये देण्यात आल्याचे स्पष्ट होते. अर्जदाराने त्याला देण्यात आलेल्या त्या पहील्या वीज वापराच्या बिला बाबत केलेल्या तक्रारी वर कोणतेही स्पष्टीकरण अथवा खुलासा न करता त्यास बिल रुपये २३७०/- ऐवजी रुपये १५००/- भरण्याचे सांगण्यात आले. अर्जदारास देण्यात आलेल्या या पहिल्या वीज वापराच्या बिलाचे निरीक्षण केल्यावर असे अढळून येते की, अर्जदाराच्या येथे बसवण्यात आलेले मिटर हे सू - स्थितीत असून त्यावरील नोंदी प्रमाणेच त्याला वीज वापराचे बिल देण्यात आले आहे. त्याच प्रमाणे नोव्हेंम्बर २००६ ते एप्रिल २००७ या काळातील वीज बिलावर दंड व व्याज आकारण्यात आलेले नाही. मंचासमोर झालेल्या सुनावणी च्या वेळी अर्जदारास सदरील बिलाबाबत स्पष्टीकरण देण्यात आले व त्याला आपले म्हणणे दिनांक १९/१०/२००७ पर्यंत लिखीत स्वरुपात दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराने आपले म्हणणे दिलेल्या मुदतीत मंचात दाखल केलेले नाही.

मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) अर्जदाराची वीज बिला बाबतची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अ. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ.

---

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

---

क्र.सीजीआरएफ/एझेड/एयुआर/यु/५९/२००७/ दिनांक ;-

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**

**२) श्री लक्ष्मीकांत वामनराव कुलकर्णी,**
**५,सुवर्ण शिल्प,देवानगरी,शहानुरमियाँ दर्गा, औरंगाबाद.**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/५९/२००७/२८
गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

**No,CGRF/AZ/AUR/U/59/2007/28/**

**Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ( O & M )**
**M.S.E.D.C.L. O&M Urban Circle,**
**Aurangabad.**

**Sub**: **Forwarding of Grievance in resepect of Shri Laxmikaint Wamanrao Kulkarni Flat No.5, Suvarn Shilp,Devanagari Shahanoorminya,Aurangabad Colony, Aurangabad. (Consumer No. 490012288587)**

**Dear Sir**

**Please find enclosed herewith a copy of the Grievance received by the Forum from Shri Laxmikaint Wamanrao Kulkarni Flat No.5, Suvarn Shilp,Devanagari Shahanoorminya,Aurangabad Colony, Aurangabad. (Consumer No. 490012288587**

**You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of this letter.**

**The hearing of the grievance is fixed on dated 16/10/2007 at 11.30 Hours .**

.

**Encl: As above**

**Copy to :**
**Shri Laxmikaint Wamanrao Kulkarni**
**Flat No.5, Suvarn Shilp,Devanagari**
**Shahanoorminya, Aurangabad**